दैनिक

मनोरंजनासह प्रबोधनासाठी...

epaper.rayatsamachar.com

# रयत समाचार

खिचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी

संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक

● RNI No. MAHMAR/2011/40847 ● वर्ष १३ वे ● अंक ४१६ वा ● शनिवार, ता.२७ सप्टेंबर २०२५ ● www.rayatsamachar.com ● पाने ४ ● मूल्य रु. ४.००



## आपले मंत्रालय' मासिकाचा छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक प्रकाशित

**मुंबई । रयत समाचार**

माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते 'आपले मंत्रालय' मासिकाचा छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक प्रकाशित करण्यात आला. यावेळी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक तथा प्रधान सचिव ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक हेमराज बागुल, उपसंचालक गोविंद अहंकारी, विशेष कार्य अधिकारी इर्शाद बागवान तसेच मंत्रालयातील अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या विशेषांकामध्ये शिवकालीन गडकिल्ले, शस्त्रे, पत्रव्यवहार, चलन, जलव्यवस्थापन अशा विविध विषयांचा सखोल आढावा घेण्यात आला आहे.




छत्रपती शिवाजी महाराजांचे तेज, विचार आणि आदर्श आजही समाजाला प्रेरणा देतात. त्यांच्या कार्याचा आणि विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवणे, हेच या विशेषांकाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी आपल्या मनोगतामध्ये नमूद केले. कार्यक्रमादरम्यान सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले यांनी स्वतः रेखाटलेली छत्रपती शिवाजी महाराजांची पेंटिंग व मूर्ती मंत्री ॲड. शेलार यांना भेटस्वरूप दिली.

# रँचो सोनम वांगचुक यांना रासुका कायद्याखाली अटक

**श्रीनगर । रयत समाचार**

थ्री ईडीयट चित्रपटात ज्यांच्या आदर्श जीवनाची झलक दाखविली ते रँचो हे पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांना अटक करण्यात आली. राष्ट्रीय सुरक्षा कायदा (रासुका) च्या अंतर्गत वांगचुक यांच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली. त्यांची रवानगी तुरुंगात करायची की त्यांच्यासाठी अन्य कोणती व्यवस्था करायची, यावर निर्णय घेतला जाणार. डीजीपी एस.डी. सिंह जामवाल यांच्या नेतृत्त्वाखाली लडाख पोलिसांच्या एका पथकाने वांगचुक यांना अटक केली. त्यांच्या अटकेनंतर खबरदारीचा उपाय म्हणून लेहमध्ये इंटरनेट सेवा खंडित करण्यात आली तसेच ब्रॉडबँड सेवेचा वेगही कमी करण्यात आला. ता. २४ सप्टेंबरला लडाखमध्ये झालेल्या हिंसाचारासाठी सरकारने वांगचुक यांना चूक धरले. वांगचुक यांच्या



चिथावणीमुळे लडाखमधील आंदोलक आक्रमक झाल्याचा सरकारचा दावा आहे. लडाखला राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीसाठी सोनम वांगचुक यांच्याकडून सातत्याने लढा दिला जात आहे. केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखला राज्याचा दर्जा मिळावा, यासाठी वांगचुक आग्रही आहेत. या मागणीसाठी त्यांनी आमरण उपोषणही सुरु केले होते. पण दोन दिवसांपूर्वी आंदोलनाला हिंसक वळण लागले. त्यात ४ जण दगावले. यानंतर वांगचुक यांनी उपोषण सोडले आणि शांततेचे आवाहन केले. आंदोलक तरुणांना चिथावणी दिल्याप्रकरणी वांगचुक यांना अटक करण्यात आली. त्यांचे उपोषण सुरु असताना २४ सप्टेंबरला लडाखमध्ये हिंसाचार झाला होता. त्यात ४ जणांचा मृत्यू , तर ९० जण जखमी झाले. हिंसाचारानंतर परिसरात कर्फ्यू लावण्यात आला. पोलीस आणि निमलष्करी दलाने कर्फ्यूची सक्तीने अंमलबजावणी केली. आतापर्यंत ५० पेक्षा जास्त जणांना अटक करण्यात आली. लेह जिल्हा प्रशासनाने सर्व सरकारी आणि खासगी शाळा, महाविद्यालये आणि अंगणवाडी केंद्रे २ दिवस बंद ठेवण्याचे आदेश दिले. कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी लेह आणि कारगिलसह अन्य शहरांमध्येही कलम १४४ लागू करण्यात आले. उपराज्यपाल कविंद्र गुप्ता यांनी उच्चस्तरीय बैठक घेत परिस्थितीचा आढावा घेतला. हिंसाचाराच्या घटना कट कारस्थानाचा भाग असल्याचे सांगत त्यांनी सतर्कता राखण्याचे आदेश केले.



## ए आय विषयाची जाण आवश्यक- विजया रहाटकर

### राष्ट्रीय महिला आयोगाचा YASHODA एआय अभियानाचा आरंभ

**जम्मू । रयत समाचार**

केंद्रीय महिला आयोगाच्या वतीने YASHODA (Your AI SAKHI for Harnessing Digital Awareness) हा कृत्रिम बुद्धिमत्ता जनजागृती अभियानाचा आरंभ जम्मू येथील केंद्रीय विद्यापीठात करण्यात आला. या कार्यक्रमाला कुलगुरू प्रा. संजीव जैन उपस्थित होते. महिला आयोगाच्या अध्यक्षा विजया राहाटकर यावेळी म्हणाल्या, एआय हा भविष्यात येणार नाही, तो आधीच आपल्या कॅम्पस, करिअर व निर्णय प्रक्रियेला आकार देत आहे. महाविद्यालय प्रवेश परीक्षा निकाल तपासणी, नेटफ्लिक्सवरील शिफारसी, नोकरीसाठी रिझ्युमे शॉर्टलिस्ट करणे यासर्व ठिकाणी एआय सक्रिय आहे. भारतामध्ये अग्रगण्य कंपन्या मुलाखतीच्या पहिल्या फेरीत एआय चॅटबॉट्सचा वापर करत आहेत. २०२६ पर्यंत जगभरातील ४५% नोकऱ्यांसाठी एआयविषयीची जाण आवश्यक ठरणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दुसरीकडे, तरुणाई एआय-आधारित गुन्ह्यांची बळी ठरत आहे. दिल्लीमध्ये गेल्या वर्षी २०० हून अधिक विद्यार्थ्यांना बनावट इंटर्नशिप योजनेत लाखो रुपये गमवावे लागले. जयपूरमध्ये एका विद्यार्थिनीचा आवाज क्लोन करून तिच्या पालकांना खोटे अपहरण दाखवून ४ लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली. फक्त एक फोटो, एक व्हॉईस नोट किंवा ऑनलाइन फॉर्म एवढ्यानेच एआयच्या हल्ल्याला आपण बळी पडू शकतो. त्यामुळे एआय आता पर्याय नाही, ती कठोर वास्तव आहे, असे रहाटकर यांनी अधोरेखित केले.

## पूरग्रस्तांसाठी छोटी मदतही मोठा आधार

**मुंबई । रयत समाचार**



महाराष्ट्रातील पूरग्रस्त जनतेवर आलेले संकट गंभीर असून त्यांच्यासाठी आपल्या सर्वांच्या सहकार्याची आज नितांत गरज आहे, असे भावनिक आवाहन विनोदी अभिनेता समीर चौघुले यांनी केले. मी स्वतः वैयक्तिकरित्या शंभर टक्के मदत करतोच आहे. मात्र, हे संकट इतके मोठे आहे की, एकट्याने कोणीही पेलू शकत नाही. त्यामुळे प्रत्येकाने आपल्या सामर्थ्यानुसार पूरग्रस्त बांधवांना मदतीचा हात द्यावा. तुमची छोटीशी मदतही त्यांच्या जगण्याला मोठा आधार ठरू शकते, असे समीर चौघुले यांनी सांगितले. पूरग्रस्त शेतकरी, कामगार व विद्यार्थ्यांच्या मदतीसाठी स्वयंसेवी संस्था, सामाजिक संघटना आणि स्थानिक युवक कार्यरत आहेत. शासनाकडून मदतीची यंत्रणा कामाला लागली असली तरी प्रत्यक्ष लोकसहभागाशिवाय हे संकट हलके होऊ शकणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले. आपले शेजारी, आपलेच बांधव अडचणीत आहेत. त्यांच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी आपण हक्काने पुढे आलो पाहिजे. हा क्षण एकात्मतेचा आहे. त्यामुळे शक्य तितक्या लवकर मदत सामग्री, आर्थिक सहाय्य किंवा स्वयंसेवक म्हणून प्रत्येकाने पुढे यावे, अशी मनापासून विनंती चौघुले यांनी केली. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी सामाजिक माध्यमांवर सुरू असलेल्या मोहिमांनाही त्यांनी पाठिंबा दर्शवला आहे.




## हृदयाच्या ठोक्यांवर डीजेम्बेचा जलवा

### हिरानंदानी हॉस्पिटलमध्ये अनोखा उपक्रम

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

जागतिक हृदय दिनानिमित्त, डॉ. एल.एच. हिरानंदानी हॉस्पिटल, पवई येथे एक आगळावेगळा उपक्रम पार पडला. डॉक्टरांसाठी खास डीजेम्बे ड्रम सेशनचे आयोजन करण्यात आले होते. हृदयाच्या ठोक्यांचे संगीतमय प्रतीक म्हणून सादर झालेल्या या तालमधुर कार्यक्रमात ५० हून अधिक डॉक्टर सहभागी झाले. त्यांनी एकत्रित ठेक्यांतून आरोग्यदायी हृदयाचे महत्त्व अधोरेखित केले. या उपक्रमाला इतर डॉक्टर, वैद्यकीय कर्मचारी आणि रुग्णांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गुंजणाऱ्या ड्रम बीट्समुळे सभागृहात एक अनोखी सकारात्मक ऊर्जा पसरली. दैनंदिन ताणतणाव विसरायला लावणाऱ्या या ठेक्यांनी डॉक्टर आणि उपस्थितांना मनःशांतीचा अनुभव दिला. मानसिक व शारीरिक तणाव हेच हृदयविकाराचे प्रमुख कारण ठरत असल्याने, निरोगी हृदयाच्या ठोक्याची जाणीव करून देण्याचा हा अभिनव प्रयत्न ठरला. या संगीतमय उपक्रमाद्वारे हॉस्पिटलने नागरिकांमध्ये व्यायाम, मनः शांती आणि हृदय आरोग्य जपण्याचा संदेश दिला. निरोगी हृदय म्हणजे आरोग्यपूर्ण जीवन हे प्रत्यक्ष अनुभवातून अधोरेखित झाले. आजकाल वीसतीसच्या वयोगटातही हृदयविकाराचे प्रमाण झपाट्याने वाढत आहे. यामागचे मुख्य कारण म्हणजे मानसिक व शारीरिक ताण. डॉक्टरांचे जीवन अत्यंत तणावपूर्ण असल्याने ते स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. डीजेम्बे सत्राचे आयोजन हे वैद्यकीय क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना स्वतःच्या हृदयाची काळजी घ्यावी यासाठीच होते. तसेच, प्रेक्षकांमध्येही हृदयाच्या ठोक्यांबाबत जागरूकता निर्माण करणे हा हेतू होता. आरोग्याची सुरुवात स्वतःच्या काळजीपासूनच होते आणि हा संगीतमय उपक्रम त्याचाच संदेश देतो, असे डॉ. समीर कुलकर्णी, मुख्य कार्यकारी अधिकारी, डॉ. एल. एच. हिरानंदानी हॉस्पिटल, पवई यांनी सांगितले.

## कवी गुरुदास रेडकर यांच्या 'बकुळ फुले' काव्यसंग्रहाचे पणजीत प्रकाशन

**पर्वरी । प्रतिनिधी**

लोकप्रिय कवी गुरुदास रेडकर यांच्या 'बकुळ फुले' या काव्यसंग्रहाचा प्रकाशन सोहळा शनिवारी ता. २७ सप्टेंबर रोजी दुपारी ३.३० वाजता मिनेजिस ब्रागांझा परिषद सभागृह, पणजी (गोवा) येथे आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून माजी केंद्रीय कायदामंत्री रमाकांत खलप, तर प्रमुख पाहुणे म्हणून गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रदीप पुंडलिक घाडी आमोणकर उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान दैनिक रयत समाचारचे समूह संपादक प्रभाकर ढगे भूषवतील. काव्यसंग्रहाचे विवेचन संत सोहिरोबानाथ आंबिये सरकारी महाविद्यालयाच्या मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. निता रघुनाथ तोरणे करतील. याशिवाय गोमंतक मराठीचे सदस्य व साहिल प्रकाशन चे प्रकाशक निलेश बुगडेही कार्यक्रमाला उपस्थित राहतील. या महत्त्वाच्या साहित्यिक सोहळ्यास साहित्य रसिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष प्रदीप घाडी आमोणकर यांनी केले आहे.

## भारताची जलसंस्कृती लोकजीवनाचा अविभाज्य भाग- डॉ. जुत्ता

### भारतातील बारवांचा वारसा या विषयी व्याख्यान संपन्न

**नवी दिल्ली । रयत समाचार**

Designing Water: Morphology and Histories of the Stepwells of India या विषयावर भारतातील सुप्रसिद्ध कला इतिहासतज्ज्ञ डॉ. जुत्ता जैन-नोबॉवर यांनी केलेले व्याख्यान यशस्वीपणे पार पडले.



यावेळी त्यांनी भारताच्या अद्वितीय जल वास्तुकलेचा सखोल आढावा घेत, बारवांची रचना, त्यांचा ऐतिहासिक प्रवास तसेच सांस्कृतिक आणि आध्यात्मिक महत्त्व यांवर प्रकाश टाकला. डॉ. नोबॉवर यांनी पायरी बारवा व पारंपरिक जलरचनांचा अभ्यास करताना त्यांचा शाश्वततेशी, धार्मिक आस्थेशी आणि सामुदायिक जीवनाशी असलेला घट्ट संबंध अधोरेखित केला.

भारताची जलसंस्कृती ही केवळ पाण्याचा साठा करण्यापुरती मर्यादित नसून ती लोकजीवनाचा अविभाज्य भाग आहे, असे त्या यावेळी म्हणाल्या. व्याख्यानाला INTACH चे अध्यक्ष अशोकसिंह ठाकूर, सदस्य सचिव डॉ. रवींद्र सिंह तसेच इतर मान्यवर उपस्थित होते. प्रेक्षकांनी या ऐतिहासिक आणि शैक्षणिक मंथनाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## एमपीएससी पूर्व परीक्षा पुढे ढकलली

**नागपूर । रयत समाचार**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) २०२५ पासून अभ्यासक्रमात बदल केल्याने राज्यसेवा पूर्व परीक्षा २८ सप्टेंबर रोजी घेण्याचे ठरले होते. मात्र, राज्याच्या विविध भागांमध्ये पूरजन्य परिस्थिती निर्माण झाल्यामुळे लाखो उमेदवारांच्या सुरक्षेच्या दृष्टीने आणि परीक्षेच्या सुरळीत आयोजनासाठी आयोगाने परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारच्या पत्रानुसार, महाराष्ट्रातील एकूण ३७ जिल्हाकेंद्रांवरील ५२४ उपकेंद्रांवर आयोजित होणाऱ्या महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा, २०२५ साठी एकूण १,७५,५१६ उमेदवारांनी अर्ज केले होते. तथापि, हवामान खात्याने काही दिवसांत अतिवृष्टीचा इशारा दिला असून अनेक गावांमध्ये संपर्क तुटल्यामुळे परीक्षेच्या दिवशी उमेदवारांना केंद्रावर पोहोचण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात, असे निदर्शनास आले. यासाठी आयोगाने ही परीक्षा २८ सप्टेंबर ऐवजी ९ नोव्हेंबर २०२५ रोजी घेण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच, या नवीन तारखेस होणाऱ्या महाराष्ट्र गट-ब (अराजपत्रित) सेवा संयुक्त पूर्व परीक्षेसाठी स्वतंत्र शुद्धिपत्रक जाहीर केले जाईल. आयोगाने सर्व उमेदवारांना सुचित केले आहे की, कोणताही उमेदवार पूरजन्य परिस्थितीमुळे परीक्षेतून वंचित राहणार नाही, तसेच नवीन तारखेनुसार तयारी करावी.

## शहरात राहणाऱ्या प्रत्येकाने शेतकऱ्यांचे ऋण मानले पाहिजे- पैगंबर शेख

### पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मुलांना इस्लाही फाउंडेशनकडून मदत

**बीड । रयत समाचार**

आपण खातो तो प्रत्येक घास शेतकरी पिकवतो, त्या ऋणाची ही परतफेड आहे, अशा शब्दांत पैगंबर शेख (इस्लाही सोशल मिडिया फाउंडेशन) यांनी आपली भावना व्यक्त केली. मराठवाड्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मुला-मुलींसाठी शैक्षणिक साहित्याचे वाटप आष्टी तालुक्यातील खिळद येथील कै. मुरलीधर गोलेसर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात करण्यात आले. या उपक्रमांतर्गत १२५ पूरग्रस्त विद्यार्थ्यांना शालेय साहित्य देण्यात आले. या शाळेत चार गावातील ३५० विद्यार्थी शिक्षण घेतात, त्यापैकी



अनेकांचे शालेय साहित्य पुरामुळे वाहून गेले होते किंवा खराब झाले होते. या कठीण परिस्थितीत विद्यार्थ्यांना उभे करण्यासाठी मदतीचा हात पुढे करण्यात आला. यावेळी पैगंबर शेख म्हणाले, मी शेतकरी नाही, कामगार पुत्र आहे. पण शहरात राहणाऱ्या प्रत्येकाने या शेतकऱ्यांचे ऋण मानले पाहिजे. लॉकडाऊनच्या काळात त्यांनी आपल्याला जगवले. आज ते पूरामुळे हवालदिल झाले आहेत. अशा वेळी त्यांना धीर देणे आणि त्यांच्या मुलांना उभे करणे आपले कर्तव्य आहे. ते पुढे म्हणाले, आपल्या पंचक्रोशीतील शेतकऱ्यांना निराश होऊ देऊ नका, आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलू नका. आम्ही माणसं जोडून शक्य ती मदत पोहोचवू. माणसं जोडली पाहिजे असेही आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाला स्थानिक मान्यवर, शिक्षक, पालक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. इस्लाही सोशल मिडिया फाउंडेशनने या मदतीसाठी पूर्णतः सोशल मीडियावरून सहकार्य उभे केले असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवणारा ठरला असून, पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबासाठी तो दिलासा देणारा किरण ठरला आहे.

## ऐतिहासिक अहमदनगरमधील गॉथिक आर्ट असलेला दुर्मिळ होम टॉवर!




ऐतिहासिक अहमदनगर शहरातील गॉथिक आर्ट असलेला दुर्मिळ होम टॉवर, जाधव बिल्डींग, रचना कला महाविद्यालय समोर, सांगळे गल्ली, अहमदनगर (अहिल्यानगर) महाराष्ट्र. शहरातील इमारती बांधताना पुर्वीच्या काळी समोरच्या बाजूने दोन व मागच्या बाजूला दोन असे तीन- चार फुट उंचीचे सुंदर टॉवर तयार करत असत. शहरातील जुन्या सर्व इमारतींना ते आहेत. ही इमारत जाधव कुटूंबायांची आहे. या इमारतीचे पुढचे दोन टॉवर गॉथिक आर्ट या परदेशी शैलीतील होते, त्यापैकी एक पुर्वीच निखळला गेला आहे. आता एक शिल्लक आहे. तो जपला पाहिजे. अहमदनगर वस्तू संग्रहालयाचे पडण्यापुर्वी प्रयत्नपुर्व तो जसाच्या तसा काढून जपून ठेवला पाहिजे. (छायाचित्र- एक्स्प्रेस फोटो, अहमदनगर)

# मानवी एकात्म दर्शन काळाची गरज- डॉ.नाबदे

## अहमदनगर महाविद्यालयात पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती साजरी



**अहमदनगर । रयत समाचार**

अहमदनगर महाविद्यालय, अहिल्यानगर अंतर्गत विद्यार्थी विकास मंडळ, मा. गांधी अभ्यास केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने पंडित दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या जयंतीमागील उद्देश पंडित दीनदयाळ यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन मानवतेची सेवा, सामाजिक एकात्मता आणि नैतिक मूल्यांचा प्रसार करणे हा होता. प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. विलास नाबदे म्हणाले, ''पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी भारतीय तत्त्वज्ञानाला पूरक असे विचार मांडले. आजच्या आधुनिक युगात आणि भारतीय लोकशाहीच्या परिघात त्यांच्या विचारांची चिकित्सा होणे गरजेचे आहे. युवक वर्ग आणि नव्या संशोधकांनी त्यांच्या विचारांचा अभ्यास करून नव्या समाजरचनेला दिशा द्यावी.'' कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नोएल पारगे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी सांगितले, ''आज आपण आपल्या समाजातील महान व्यक्तिमत्त्व पंडित दीनदयाळ यांचे स्मरण करत आहोत. त्यांच्या विचारांचे केंद्रबिंदू मानवी एकात्मता, सामाजिक न्याय आणि साधेपणा हे होते. या कार्यक्रमातून विद्यार्थ्यांनी एकात्म मानवदर्शनाचा संदेश आत्मसात करून मार्गक्रमण करावे.'' कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यार्थी विकास अधिकारी प्रा. डॉ. भागवत परकाळ यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. अजय बनसोडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. लाटे यांनी मानले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या रजिस्टार कल्पलता भिंगारदिवे, उपप्राचार्य प्रा. दिलीपकुमार भालसिंग, कायम विनानुदान विभाग प्रमुख डॉ. सय्यद रज्जाक, उपप्राचार्य प्रीतमकुमार बेदरकर यांचे विशेष सहकार्य लाभले. गणित विभाग प्रमुख डॉ. सुरेश घुले, संशोधक विभाग समन्वयक डॉ. अभिजित कुलकर्णी, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. सुधीर वाडेकर उपस्थित होते. तसेच प्रा. डॉ. भास्कर कसोटे, प्रा. आकांक्षा नवले आणि प्रा. पुनम घोडके यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. विद्यार्थी विकास मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, राज्यशास्त्र विभाग आणि आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रातील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सीसीएमपी रजिस्ट्रेशन प्रकरणी सरकारने तातडीने कारवाई करावी

### एमएमसी जाणीवपूर्वक टाळाटाळ करत असल्याचा आरोप

**अहमदनगर । रयत समाचार**

राज्यातील होमिओपॅथी डॉक्टरांना सीसीएमपी (Certificate Course in Modern Pharmacology) कोर्सनंतर महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलकडून (एमएमसी) रजिस्ट्रेशन मिळण्यासाठी न्यायालयाचे स्पष्ट आदेश असूनही एमएमसी जाणीवपूर्वक विलंब करत असल्याचा आरोप शिवसेनाच्या (शिंदे गट) डॉक्टरांनी केला आहे. या संदर्भात पंचायत समितीचे माजी उपसभापती तथा शिवसेना डॉक्टर सेलचे महाराष्ट्र राज्य विस्तारक डॉ. दिलीप दत्तात्रय पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांना निवेदन दिले असून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. डॉ. पवार यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, सन २०१४ मध्ये राज्य सरकारने होमिओपॅथी डॉक्टरांना ॲलोपॅथी औषधोपचार करण्याची परवानगी देत एक वर्षाचा सीसीएमपी कोर्स सुरू केला. हा कोर्स उत्तीर्ण झालेल्या डॉक्टरांचे रजिस्ट्रेशन महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल ॲक्ट १९६५ मधील शेड्युल २८ अंतर्गत स्वतंत्र नोंदणी पुस्तिकेत करण्याची तरतूद असूनही, एमएमसीने अद्यापही प्रक्रिया पूर्ण केलेली नाही. आयएमएने (इंडियन मेडिकल असोसिएशन) या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. मात्र, न्यायालयाने कुठेही स्थगिती न देता उलट रजिस्ट्रेशन सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. तरीदेखील आयएमए सरकारवर दबाव आणत मंत्रालयात बैठका घेत असून, यामुळे न्यायालयाचा अवमान होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. यामुळे राज्यातील १३ कोटी जनतेला होमिओपॅथी डॉक्टरांकडून मिळणाऱ्या वैद्यकीय सेवांमध्ये अडथळा निर्माण होत असल्याचेही पत्रात नमूद केले आहे. गेल्या दहा वर्षांपासून आयएमए वारंवार अडथळा निर्माण करत असून, यामुळे राज्यातील जवळपास एक लाख होमिओपॅथी डॉक्टरांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. हा संघर्ष टाळण्यासाठी एमएमसीने सीसीएमपी रजिस्ट्रेशन तातडीने देण्याचे निर्देश सरकारने द्यावेत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावेळी डॉ. राजेंद्र थोरात, डॉ. अशोक भोजने, डॉ. दीपक दरंदले, डॉ. एम. एस. आव्हाड आदी उपस्थित होते.

## अहमदनगर/पुणे येथील संशोधकाचा जागतिक सन्मान

### प्रमोद जाधव यांचे संशोधन मान्य



**अहमदनगर । रयत समाचार**

जगभरातील अवकाश संशोधन संस्थांमध्ये अमेरिकेची नासा (NASA) पहिल्या क्रमांकावर मानली जाते. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर सर्वात मोठी आणि प्रभावी संस्था म्हणजे युरोपियन अवकाश संस्था (ESA) असून, युरोपातील २२ पेक्षा जास्त देशांच्या संयुक्त प्रयत्नांतून कार्यरत असलेली ही संस्था उपग्रह प्रक्षेपण, ग्रह संशोधन आणि नवीन तंत्रज्ञान विकासात अग्रणी आहे. या आंतरराष्ट्रीय दर्जाच्या संस्थेमध्ये अहमदनगर/पुणे येथील संशोधक प्रमोद सुमन श्रीधर जाधव यांनी सादर केलेले क्वांटम-ॲडॅप्टिव्ह होमोलॉजी फिल्टरिंग (QAHF) हे संशोधन अधिकृतरित्या स्वीकारले गेले आहे. ही अहमदनगर आणि महाराष्ट्रासाठी अभिमानाची बाब मानली जात आहे. QAHF या पद्धतीत स्ट्रक्चरल एंट्रॉपी आणि क्वांटम-प्रेरित प्रॉबॅबिलिटी लॉजिक या दोन महत्त्वाच्या घटकांवर आधारित नवीन गणितीय सूत्र तयार करण्यात आले आहे. या सूत्रामुळे उपग्रह व ग्रह संशोधनात मिळणाऱ्या आकडेवारीतून अनावश्यक नॉईज मोठ्या प्रमाणात कमी करता येते. या संशोधनामुळे ७० टक्क्यांपर्यंत नॉईज कमी होऊन वैज्ञानिकांना अधिक स्वच्छ व विश्वासार्ह डेटा मिळतो. तसेच ४० ते ६० टक्के जलद विश्लेषण करता येत असल्याने वेळ आणि संगणकीय साधनांची बचत होते. यामुळे अधिक अचूक निष्कर्ष मिळवणे सुलभ होऊन उपग्रह, ग्रह संशोधन व खगोलभौतिकी क्षेत्रात कार्यक्षमता वाढते. वास्तविक वेळेत निर्णय घेणे अधिक सुलभ होत असल्याने ESA च्या मोहिमांना गती मिळण्यास मदत होते. तंत्रज्ञानाचा थेट फायदा ESA च्या विविध महत्त्वाच्या मोहिमांना होऊ शकतो. जगातील सर्वोच्च अवकाश संस्थांपैकी एक असलेल्या ESA मध्ये हे संशोधन मान्यता मिळाल्याने भारताचा झेंडा अवकाश संशोधन क्षेत्रात उंच फडकला आहे. अहमदनगरसारख्या ग्रामीण भागातून आलेल्या संशोधक प्रमोद जाधव यांनी केलेली ही कामगिरी महाराष्ट्र आणि देशासाठी प्रेरणादायी ठरली आहे.




## ॲण्टीकरप्शन ब्युरो ऑफ इंडियाच्या शहराध्यक्षपदी- बाळासाहेब नागूल

**अहमदनगर । रयत समाचार**

शिर्डी येथील साईछत्र हॉटेलमध्ये ॲण्टीकरप्शन ब्युरो ऑफ इंडिया (भ्रष्टाचारविरोधी) संस्थेच्या राज्यस्तरीय पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम पार पडला. यावेळी संस्थेच्या अहिल्यानगर शहराध्यक्षपदी बाळासाहेब नागूल यांची निवड करण्यात आली. देशाध्यक्ष राजेश जिंदाल यांच्या उपस्थितीत त्यांना अध्यक्षपदाची नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आली. या पदासाठी महाराष्ट्र राज्याचे ॲड. नारायण राऊत यांनी नाव सुचविले होते. या कार्यक्रमास देशाध्यक्ष राजेश जिंदाल, देशाचे उपाध्यक्ष दिलीप सोनवणे (नाना), महाराष्ट्र अध्यक्ष मनिष खुराणा, राज्य संचालक पत्रकार प्रमोद शितोळे, महिला राज्याध्यक्षा उमा कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराज आणि श्री साईबाबा यांच्या प्रतिमांना वंदन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

या प्रसंगी राज्यातील अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, सांगली, सातारा, पुणे, बीड आदी ठिकाणांहून आलेले अध्यक्ष, उपाध्यक्ष, तालुकाध्यक्ष, पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमात देशाध्यक्ष राजेश जिंदाल यांनी भ्रष्टाचारविरोधी लढ्यावरील मार्गदर्शनपर भाषण केले. तसेच दिलीप सोनवणे (नाना), मनिष खुराणा, पत्रकार प्रमोद शितोळे व उमा कांबळे यांनीही आपले विचार मांडले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राज्य संचालक पत्रकार प्रमोद शितोळे व महिला राज्याध्यक्षा उमा कांबळे यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन देशाचे उपाध्यक्ष दिलीप सोनवणे (नाना) यांनी केले.

शेवटी आभार प्रदर्शनही सोनवणे यांनीच केले. या यशस्वी आयोजनासाठी ॲण्टीकरप्शन ब्युरो ऑफ इंडियाच्या सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सौरभ लांडे यांची राज्यकर निरीक्षक व सहाय्यक कक्ष अधिकारी पदी निवड



**अहमदनगर । रयत समाचार**

शहरातील विभागीय डाकघरातील स्टेनोग्राफर शिवाजी लांडे यांचे चिरंजीव सौरभ लांडे यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत राज्यात सहाव्या क्रमांकाने यश संपादन करून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. या उल्लेखनीय यशाच्या जोरावर त्यांची निवड राज्यकर निरीक्षक व सहायक कक्ष अधिकारी या पदांसाठी झाली आहे. सौरभ लांडे यांचे शालेय व महाविद्यालयीन शिक्षण अहिल्यानगर येथेच झाले. पुढे त्यांनी छत्रपती संभाजीनगर येथील अभियांत्रिकी महाविद्यालयातून बी.ई. (इलेक्ट्रिकल) पदवी संपादन केली. त्यानंतर त्यांनी घरी राहून स्पर्धा परीक्षेची तयारी करत अथक परिश्रमांच्या जोरावर हे यश मिळवले. त्यांच्या या कामगिरीबद्दल

> **सौरभने मिळविलेले यश हे कुटुंबासाठी अनमोल आहे व त्याचा आम्हांस सार्थ अभिमान आहे.**
> शिवाजी लांडे, वडील

### पोस्टल संघटनेच्या वतीने सत्कार सोहळा

पोस्टल संघटनेतर्फे आयोजित सत्कार सोहळ्यात महाराष्ट्र व गोवा राज्याचे कार्याध्यक्ष संतोष यादव म्हणाले, ''सौरभ यांनी स्पर्धा परीक्षेत मिळवलेले यश हे निश्चितच सर्वांसाठी अभिमानास्पद आहे.'' सत्कार प्रसंगी सचिन थोरवे, नामदेव डेंगळे, प्रदीप सूर्यवंशी, सुनील थोरात, शिवाजी लांडे, नंदा लांडे, प्रतिक तनपुरे, विलास कोतकर यांच्यासह संघटनेचे अनेक सभासद उपस्थित होते. तसेच पोस्टल संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुनिल झुंजारराव, निसार मुजावर, धनंजय राऊत (दिल्ली), राज्याध्यक्ष आर. एच. गुप्ता व राज्य सचिव संतोष कदम (मुंबई) यांनी दूरध्वनीद्वारे विशेष अभिनंदन केले.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री । नोकरी विषयक । नावात बदल
आरोग्य विषयक । वाढदिवस । विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
- संपर्क -
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ, 7774001800, समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा, 9373021584, गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी - गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक, 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# जिल्हाधिकाऱ्यांनी कसूरी अहवाल पाठवावा- पालकमंत्री राधाकृष्ण विखे

## कल्याणविशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गाचे काम सदोष

**पाथर्डी । नितीन गटाणी**

कल्याणविशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गाचे काम अनेक ठिकाणी सदोष पद्धतीचे झाल्याचे निदर्शनास आले असून चुकीच्या कामामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. याबाबतचा कसुरी अहवाल राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे जिल्हाधिकारी यांनी पाठवावा, असे आदेश जिल्हा प्रशासनाला दिल्याची माहिती पालकमंत्री व जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. पालकमंत्री विखे यांनी पाथर्डी तालुक्यातील अतिवृष्टी बाधित भागाची पाहणी करून मोहटादेवी येथे पुरस्थिती संदर्भात राष्ट्रीय महामार्ग, जिल्हा परिषद, लघुपाटबंधारे, बांधकाम, महसूल, कृषी आदी विभागांची आढावा बैठक घेतली. यावेळी आमदार मोनिका राजळे, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक वैभव कलुबुर्गे, प्रांताधिकारी प्रसाद मते यांच्यासह तालुका प्रशासनाचे अधिकारी व पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते. यापूर्वी नामदार विखे यांनी मोहटादेवी गडावर महापुजा करून देवीचे आशीर्वाद घेतले. देवस्थानच्या वतीने त्यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. दौऱ्यात निवडुंगे, माळी बाभळगाव, कारेगावसह अनेक गावांतील नागरिकांनी पुरामुळे झालेल्या नुकसानीची माहिती देत तातडीने मदत व निधी मिळावा, अशी मागणी केली.



पत्रकारांशी बोलताना विखे म्हणाले की, ''कल्याणविशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावरील अहिल्यानगर ते मिडसांगवी जिल्हा हद्दीपर्यंत जागोजागी खड्डे पडले असून पुलांची कामे अर्धवट आहेत. अनेक ठिकाणी साईड गटारचे काम झालेले नाही. रस्त्याच्या निकृष्ट दर्जामुळे पूल खचले, रस्ता वाहून गेला आणि अनेक पुलांचे आकृतीबंध चुकीचे असल्याने मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. त्यामुळे नागरिकांचे हाल होत आहेत.'' ते पुढे म्हणाले, ''मागील पन्नास वर्षांत झाला नाही इतका पाऊस या आठवड्यात झाला आहे. अतिवृष्टीमुळे निर्माण झालेल्या नैसर्गिक संकटात नागरिकांना तातडीची मदत मिळावी यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने यंत्रणा कार्यान्वित करावी. कोणता बंधारा फुटला किंवा कोणता रस्ता कोणत्या विभागाकडे आहे, यामध्ये न गुंतता नागरिकांना तत्काळ मदत मिळणे आत्ता महत्त्वाचे आहे. नागरिकांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी प्रशासनाने सक्रिय राहावे.'' हवामान खात्याने दिलेल्या इशाऱ्याकडे स्थानिक प्रशासनाने गांभीर्याने लक्ष ठेवून सतर्क राहण्याचे निर्देशही विखे यांनी दिले. पाथर्डीशेवगाव तालुक्यात प्राथमिक अंदाजानुसार सुमारे एक लाख हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्र बाधित झाल्याचे त्यांनी सांगितले. सर्व नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे सुरू असून माती वाहून गेलेल्या खरड जमिनीसाठी शासनाकडून तलावातील माती टाकण्यासाठी शेतकऱ्यांना मदत देण्यात येईल, असे आश्वासनही त्यांनी यावेळी दिले. रयत समाचार



# लिंबू वर्गीय फळपिक किड-रोग नियंत्रण कार्यशाळा व सोयाबीन पिक शेती दिन उत्साहात साजरा

**नगर तालुका । समीर मन्यार**

देहरे येथे लिंबू वर्गीय फळपिक किड व रोग नियंत्रण कार्यशाळा घेण्यात आली. याचबरोबर राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान कडधान्य अंतर्गत राबविण्यात आलेल्या तुर आंतरपिक सोयाबीन पिकाचा शेती दिनही उत्साहात साजरा करण्यात आला. संत्रा तज्ज्ञ किरण कोल्हे यांनी संत्रा पिकावरील प्रमुख किड व रोगांची लक्षणे, त्यांचा प्रादुर्भाव आणि नियंत्रण याबाबत मार्गदर्शन करताना बहार धरताना घ्यावयाची काळजी तसेच फवारणीचे नियोजन याविषयी सविस्तर माहिती दिली.

उप कृषी अधिकारी बाळासाहेब काकडे यांनी कांदा बियाणे तयार करण्याचे महत्त्व, लागवड करताना घ्यावयाची काळजी, रोपांची संख्या आणि अपेक्षित उत्पादनासाठी खत नियोजन याबाबत शेतकऱ्यांना सखोल मार्गदर्शन केले. खोपेश्वर महिला शेतकरी गटाच्या अध्यक्षा वैषाली वाळके यांनी तुर आंतरपिक सोयाबीन पिक पद्धतीबाबत माहिती देताना शेतकऱ्यांनी बीबीएफ पद्धतीचा अवलंब केल्यामुळे अतिवृष्टीमुळे होणारे नुकसान टळल्याचा अनुभव मांडला. तसेच बियाण्यांची उगवण क्षमता चाचणी, बियाणे प्रक्रिया, दशपर्णी अर्क, जिवामृत वापराचे फायदे आणि त्याद्वारे खतांवरील खर्चात होणारी बचत याबाबतही त्यांनी मार्गदर्शन केले. के बी बायोटेकचे डॉ. सतीष सोनवणे यांनी अतिप्रमाणात खतांचा वापर केल्यामुळे जमिनीवर होणारे नुकसान याचे प्रात्यक्षिक दाखवले. उप कृषी अधिकारी विजय सोमवंशी यांनी कृषी विभागाच्या विविध योजनांची माहिती देऊन सर्व शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. प्रात्यक्षिक आयोजन व नियोजन सहाय्यक कृषी अधिकारी कविता मदने, खोपेश्वर महिला शेतकरी गटाच्या अर्चना आडसुरे, ऊषा वाळके, शेतमळा शेतकरी प्रोड्युसर कंपनीचे दत्तात्रय जगताप, सोमनाथ काळे, वैभव लांडगे, प्रविण करंडे यांनी केले. कार्यक्रमास विठ्ठल काळे, विठ्ठल पटारे, अर्जुन काळे, उत्तम पठारे, भानुदास भगत, संजय काळे, रमेश काळे, किरण लांडगे, बी. जी. लांडगे, कैलास डावरे यांसह तालुक्यातील प्रगतशील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर कार्यक्रम तालुका कृषी अधिकारी अशोक वाळके व मंडळ कृषी अधिकारी माधवी घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. रयत समाचार

# मतमोजणीच्या नियमात बदल निवडणूक आयोगाचा निर्णय

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

एकिकडे मतमोजणीमध्ये पारदर्शकता नाही म्हणून विरोधकांकडून सतत सत्ताधाऱ्यांसह निवडणुक आयोगावर टीका केली जाते. दरम्यान, पारदर्शकतेसाठी निवडणुक आयोगाकडून आणखी एक निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक मत योग्यरित्या मोजले जावे, कोणत्याही अडथळ्यांशिवाय प्रक्रिया व्हावी यासाठी आयोगाने आणखी एक पाऊल उचलले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने २४ तासांत दुसरा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. मतदारयादीतून मतदाराचे नाव वगळण्याबाबतच्या प्रक्रियेच्या नियमात पारदर्शकता आणल्यानंतर आता मतमोजणीबाबतही निवडणूक आयोगाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. दिव्यांग मतदार आणि ८५ वर्षांपेक्षा जास्त वयाच्या ज्येष्ठ नागरिकांसाठी घरबसल्या मतदानाची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे. अशा परिस्थितीत पोस्टल मतांची अचूक आणि वेगवान मोजणी सुनिश्चित करण्यासाठी आयोगानं नव्या सूचना जारी केल्या आहेत. अनेक निवडणुकांमध्ये टपाली मतदानावरून घोळ झाल्याचे आढळून आले आहे. मतमोजणीच्या अखेरपर्यंत टपाली मतदानावरून उमेदवार आमनेसामने उभे ठाकलेले असतात. आता आयोगाने मतमोजणीच्या नियमात बदल केला आहे. निवडणूक आयोगाने प्रसिद्धिपत्रक जाहिर करत मतमोजणीच्या दिवशी टपाली मतदानाची मोजणी सकाळी १० वाजता सुरू होते. त्यानंतर सकाळी ८.३० वाजता ईव्हीएम मधील मतांची मोजणी सुरू केली जाते. यापूर्वी ईव्हीएमची मोजणी टपाली मतमोजणीच्या कोणत्याही टप्प्यावर सुरू ठेवली जात होती. आयोगानं मतमोजणी केंद्रांवर अधिक टेबल्स आणि कर्मचारी उपलब्ध करून देण्याचे आदेश दिलेत. त्यामुळे पोस्टल मतपत्रिकांची मोजणी वेळेत आणि काटेकोरपणे पूर्ण होणार आहे. या निर्णयामुळे मतमोजणीच्या प्रक्रियेत गती येणार असून, अंतिम निकाल जाहीर करण्यात होणारा विलंब टाळता येईल. ईव्हीएम मतमोजणीच्या अखेरच्या दोन फेऱ्या शिल्लक असताना टपाली मतमोजणी सुरू असल्यास ईव्हीएमची मतमोजणी थांबविली जाईल. टपाली मतमोजणी पूर्ण झाल्यानंतरच ईव्हीएमच्या राहिलेल्या दोन फेऱ्यांची मतमोजणी पूर्ण होईल. मतमोजमीची प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि एकरूप होण्यासाठी हे पाऊल उचलण्यात आले आहे. प्रत्येक मताची मोजणी योग्यप्रकारे आणि कोणत्याही अडथळ्यांशिवाय व्हावी, हे अपेक्षित असल्याचे आयोगाने म्हटले आहे. टपाली मतांची संख्या अधिक असल्यास त्याठिकाणी योग्य प्रमाणात टेबल्स आणि मतमोजणी करणाऱ्यांची पुरेशी संख्या उपलब्ध असायला हवी, असे आयोगाने स्पष्ट केले आहे. रयत समाचार

# पारंपरिक व उत्साही वातावरणात तुळजाभवानी माता पालखीचे भव्य स्वागत

**पाथर्डी । नितीन गटाणी**

पाथर्डी शहरात शारदीय नवरात्रोत्सवात तुळजाभवानी मातेच्या पालखीचे अत्यंत उत्साही वातावरणात भव्य स्वागत करण्यात आले. ''जय भवानी, जय शिवाजी'', ''सदानंदाचा उदे, उदे'', ''तुळजाभवानी माता की जय'' अशा जयजयकारांनी वातावरण गजरले. फटाक्यांची आतेशबाजी, रंगीबेरंगी फुले व हळद-कुंकूची उधळण, पालखी मार्गावर सुमारे एक किलोमीटर रांगोळ्या व फुलांच्या पायघड्या याने शहरात पारंपरिक व उत्साही वातावरण निर्माण केले. अहिल्यानगरहून निघालेली ही पालखी तुळजापूरकडे मार्गस्थ झाली. हजारो स्त्री-पुरुष भक्त ओसंडून वाहणाऱ्या उत्साहात भक्ती रसात न्हालेल्या दिसले. गेल्या पाच वर्षांपासून शारदीय नवरात्रोत्सवात तुळजाभवानीची मानाची पालखी शहरात वाजत-गाजत मिरविली जाते. पालखीचे स्वागत पोलीस दलाने केले. पोलीस निरीक्षक विलास पुजारी यांनी महापूजा करून पालखीचे स्वागत केले, तर पालखीला निरोप देण्याचा मान महिला मंडळाला देण्यात आला. शेकडो महिलांनी भावपूर्ण वातावरणात हळद-कुंकू वाहून आणि साड्या अर्पण करून पालखीला निरोप दिला. सर्व पोलिसांनी अजंठा चौकात पालखी उचलून मिरवली. शहरातील विविध थरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. दोन क्विंटल हळद-कुंकू आणि पाच क्विंटल फुलांचा वापर पालखी व भंडाऱ्यावर उधळण्यात आला. प्रत्येक चौकात उत्साही महिला भाविकांनी फ ेर धरत, फुगड्या खेळून आनंद व्यक्त केला. सुमारे सातशे साड्या व समान संख्या नारळांची जमवा-जमवी करताना स्वयंसेवक भारावून गेले. संबळ, आराधी व जोगते यांच्या वाद्यसंगीताने



संपूर्ण वातावरण नवरात्रमय बनवले. शारदीय नवरात्रोत्सवात तुळजापूरच्या देवीच्या पालखी व पलंगाला विशेष महत्त्व आहे. अहिल्यानगरच्या बुऱ्हानगर येथील देवकर कुटुंब या पालखीचे पिढ्यानपिढ्या देखभाल करीत आहेत. नालेगाव येथील पलंगे कुटुंब देवीचा पलंग बनवते. दसऱ्याच्या दिवशी देवीची पालखी अहिल्यानगरहून आलेल्या पालखीतच मिरविली जाते, त्यानंतर देवीची ''मंचकी निद्रा'' सुरू होते. राज्यातील तुळजापूर सारख्या प्रमुख शक्तीपीठात अहिल्यानगरचा मान सर्वश्रेष्ठ मानला जातो. पालखी व पलंग यांची तिसऱ्या माळेला भिंगार शहरात भेट होते. उत्सव पूर्ण झाल्यानंतर पालखी व पलंग मंदिरासमोरील होमामध्ये ठेवले जातात. मिरवणुकीसाठी शहराच्या पाच किलोमीटर अंतरावरून भाविक आले. सर्वांना समितीतर्फे खिचडी महाप्रसादही देण्यात आला. गुरुवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास शहरात पालखीचे आगमन झाले आणि सुमारे चार तास मिरवणूक सुरू राहिली. प्रमुख चौकांमध्ये इमारत व जेसीबीतून फुलांची उधळण करण्यात आली. संयोजन समितीचे निमंत्रक अशोक साठे, मंगेश भागवत, अनिल साठे, आदिनाथ डोमकावळे, अजय साठे, महेश बाहेती यांच्यासह सर्व सदस्यांनी उत्सव यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम घेतले. रयत समाचार

# बेलापूर- राहुरी फॅक्टरी रस्त्याच्या दुर्दशेस ठेकेदार जबाबदार- मुथा

## सा.बां. खात्याच्या अधिकाऱ्यांची मूकसंमती?

**बेलापूर । शफीक बागवान**



बेलापूर ते राहुरी फॅक्टरी या रस्त्यांवर जागोजागी खड्डे पडल्याने दुर्दशा झाली आहे. या रस्त्याच्या दुरावस्थेत ठेकेदार जबाबदार असून यामुळे प्रवाशांना जीव मुठीत धरुन प्रवास करावा लागत आहे. रस्त्यांच्या दुर्दशेकडे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिका-यांचे अक्षम्य दुर्लक्ष होत आहे. ठेकेदारास त्यांचीच फुस असून रस्ता सुधारणेकडे बेफिकीरी असेल तर उग्र आंदोलन छेडावे लागेल, असा इशारा जिल्हा टॅक्सी असोसिएशनचे अध्यक्ष सुनिल मुथा यांनी दिला.मुथा म्हणाले, श्रीरामपूर ते बेलापूर हा रस्ता माजी आमदार लहु कानडे यांनी त्यांचे निधीतून केला. या वर्दळीच्या रस्त्यावर आता जागोजागी खड्डे पडले आहेत. अशीच अवस्था बेलापूर बायपास-झेंडा चौक-कोल्हार चौक ते राहुरी फॅक्टरी या रस्त्याची झाली आहे. केवळ दोन वर्षात या रस्त्यांची वाताहत झाली असून ठेकेदाराने केलेल्या जुजबी कामाच्या दर्जाचे पितळ उघडे पडले. रस्त्यांच्या खड्ड्यांचे यापुढील काम दर्जात्मक आणि तातडीने व्हावे, अशी ही मागणी मुथा यांनी केली. या दोन्हीही रस्त्यांचे काम एकाच ठेकेदाराने केले आहे. देवळाली ते राहुरी फॅक्टरी दरम्यानच्या रस्त्याची डागडुजी करण्यात आली असून या रस्त्याचा वापर ठेकेदार करीत आहे. स्वतःच्या फायद्याच्या रस्त्याची डागडुजी होते मग श्रीरामपूर- बेलापूर व बेलापूर ते देवळाली या अंतराच्या रस्त्याची का होत नाही, असा सवाल मुथा यांनी केला. यासंदर्भात तक्रार करण्यासाठी श्रीरामपूर सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे अभियंता यांना वेळोवेळी फोन केला असता त्यांच्याकडून उत्तर मिळत नाही. दरम्यान या रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागावा यासाठी जनांदोलनाच्या मार्गाने जावे लागेल, असा इशारा मुथा यांनी दिला. रयत समाचार

# महाराष्ट्र कृषी तंत्रज्ञ संस्था नियामक मंडळ सचिवपदी डॉ. प्रशांत बोडके यांची निवड

**राहुरी । रयत समाचार**



महाराष्ट्र कृषी तंत्रज्ञ संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा पुण्यातील महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषदेत उत्साहात संपन्न झाली. या वेळी झालेल्या संस्थेच्या नियामक मंडळाच्या निवडणुकीत महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथील कृषी तंत्रज्ञानचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. प्रशांत बोडके यांची नियामक मंडळाचे सचिव म्हणून बिनविरोध निवड करण्यात आली. या सचिवपदाचा कालावधी सन २०२६ ते २०३१ असा पाच वर्षांचा असणार आहे. या निवडीदरम्यान संस्थेचे अध्यक्ष माजी कुलगुरु डॉ. व्यंकटराव मायंदे, डॉ. राजाराम देशमुख, माजी कृषी आयुक्त डॉ. उमाकांत दांगट, डॉ. रामकृष्ण मुळे, सुदाम अडसूळ, अतुल मारणे आदी मान्यवर उपस्थित होते. महाराष्ट्र कृषी तंत्रज्ञ संस्था, पुणे ((Institution of Maharashtra Agricultural Technologists - IMAT)) ही कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञानाच्या प्रसारासाठी कार्य करणारी नोंदणीकृत संस्था असून कृषी तंत्रज्ञानाची प्रगती आणि शेतकऱ्यांच्या क्षमताविकासासाठी स्वतंत्रपणे कार्य करते. संस्थेमार्फत कृषी क्षेत्रातील तंत्रज्ञान, प्रगत पद्धती व नवकल्पना यांवर आधारित वेबसंवाद, कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रम नियमितपणे आयोजित केले जातात. डॉ. प्रशांत बोडके यांच्या या निवडीबद्दल महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख यांनी विशेष अभिनंदन केले. रयत समाचार

# कर्मवीर अण्णांच्या शाळा गोरगरिबांच्या अस्मिता फुलविणारी तपोभूमी- डॉ. पाटणे

**कोपरगाव । किसन पवार**

''बहुजन समाज शिक्षणापासून वंचित राहिला तर येणाऱ्या पिढ्या सामाजिक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल होतील, ही जाणीव ओळखून समाजाला वैचारिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था स्थापन केली. त्यांच्या 'कमवा व शिका' योजनेमुळे विद्यार्थ्यांना स्वावलंबी व स्वाभिमानी बनविले. गोरगरीब विद्यार्थ्यांची शिक्षणाप्रती अस्मिता जागृत केली. त्यामुळे आज लाखो विद्यार्थी आपले जीवन घडवत आहेत,'' असे प्रतिपादन सुप्रसिद्ध वक्ते व लेखक प्राचार्य डॉ. यशवंत पाटणे यांनी केले. येथील रयत शिक्षण संस्थेच्या श्री. सद्‌गुरु गंगागीर महाराज सायन्स, गौतम आर्ट्स अँड संजीवनी कॉमर्स




कॉलेज, कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व तांत्रिक विद्यालय, पद्मा मेहता प्राथमिक कन्या विद्यामंदिर, डॉ. सी. एम. मेहता कन्या विद्यामंदिर आणि कर्मवीर भाऊराव पाटील प्राथमिक विद्यालय या पाच शाखांच्या वतीने १३८वा कर्मवीर जयंती सोहळा नुकताच उत्साहात संपन्न झाला. रयतगीत व स्वागतगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रमुख अतिथी म्हणून बोलताना डॉ. यशवंत पाटणे म्हणाले, ''कर्मवीरांचा लढा मानव प्रतिष्ठेसाठी होता. त्यांनी शिक्षण हे मानवाच्या सर्वांगीण प्रगतीचे प्रवेशद्वार मानले. जीवन क्षमतांचा विकास, मूल्यसंवर्धन व श्रमाधिष्ठित शिक्षणाचा पुरस्कार करून समाजातील विविध घटकांमध्ये विश्वासार्हता व समता या नैतिक मूल्यांची जपणूक केली. गुणवत्तेचा कस जीवनातील आव्हाने पेलताना दिसतो, याची शिकवण आजही रयत शिक्षण संस्था देत आहे.'' कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे व्हा. चेअरमन व महाविद्यालय विकास समितीचे चेअरमन ॲड. भगीरथ शिंदे होते. आपल्या अध्यक्षीय मनोगतात ते म्हणाले, ''अज्ञानात चाचपडणाऱ्या समाजाला दिशा देण्याचे कार्य कर्मवीरांनी केले. आज बदलत्या काळानुसार रयत शिक्षण संस्था कृत्रिम बुद्धिमत्ता विषयाचे मोठ्या प्रमाणात शिक्षण देत आहे, हे अभिमानास्पद आहे.'' या कार्यक्रमासाठी गोदावरी दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे, जनरल बॉडी सदस्य पद्माकांत कुदळे, सुरेश बोळीज आदी मान्यवर उपस्थित होते. पाचही शाखांचे शाखाप्रमुख प्राचार्य डॉ. माधव सरोदे, म्हस्के, काशिनाथ लव्हाटे, सुभाष दरेकर, शिवाजी लंके, उपप्राचार्य डॉ. अर्जुन भागवत, डॉ. घनश्याम भगत, प्रा. संजय शिंदे, कार्यालय अधीक्षक सुनील गोसावी यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. माधव सरोदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. संतोष पवार यांनी करून दिला. मान्यवरांचे आभार काशिनाथ लव्हाटे यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सीमा दाभाडे व प्रा. रवींद्र हिंगे यांनी केले. या वेळी पाचही शाखांतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. रयत समाचार

# गुगल गुरूचा वाढदिवस!

आजचे युग हे इंटरनेटचे युग आहे. इंटरनेट म्हणजे माहितीचा खजिना. इंटरनेटवर कोणतीही माहिती एका क्लिकवर उपलब्ध असते. कोणतीही माहिती शोधायची असेल तर गुगलवर सर्च केले जाते. अभ्यासाच्या काही नोट्स काढायच्या असतील किंवा काही संदर्भ शोधायचे असेल तर गुगलला सर्च केले जाते. गुगलही क्षणात हवी ती माहिती पुरवते म्हणूनच गुगलला गुरु असे म्हटले जाते. गुगल गुरूमुळे माहितीचा महास्फोट झाला आहे. गुगल म्हणजे इंटरनेट वरील एक विश्वच आहे. आज त्याच गुगल गुरू चा वाढदिवस आहे.

अमेरिकेतील मेनलो पार्कमधील सुसान वेजोसिकी गॅरेजमध्ये लॅरी पेज व सर्जेई ब्रिन यांनी ७ सप्टेंबर १९९८ साली गुगल कंपनीची स्थापना केली. लॅरी पेज व सर्जे ई ब्रिन यांनी सुरवातीला या कंपनीचे नाव बॅकरब असे ठेवले होते. मात्र नंतर ते बदलून गुगल असे ठेवण्यात आले. त्याचे कारणही रंजक आहे. गुगल ही एक गणिती संज्ञा आहे. एकावर १०० शुन्ये दिल्यावर जो आकडा येतो त्याला गुगल म्हटले जाते. मिल्टन सिरोट्टा या गणित तज्ज्ञाने ही संज्ञा शोधून काढली व वापरली. जगातील प्रचंड माहितीच्या साठ्याचे व्यवस्थापन करणे व जगातील कोणालाही ही माहिती सहजगत्या उपलब्ध करून देणे हा हेतू असल्याने कंपनीचे नाव गुगल असे ठेवण्यात आले. गुगल कंपनीची स्थापना ७ सप्टेंबरला झाली असली तरी २००५ पासून कंपनीने २७ सप्टेंबर हा दिवस वाढदिवसासाठी जाहीर केला. या पाठीमागचे कारण म्हणजे २७ सप्टेंबर रोजी गुगलला सर्वात अधिक पेज व्ह्यू मिळाले. २७ सप्टेंबर या दिवशी सर्वात जास्त पेज व्ह्यू मिळाल्याने हाच दिवस गुगलचा वाढदिवस म्हणून साजरा करण्यात यावा असा अट्टाहास गुगलमधील कर्मचाऱ्यांनी धरला. कंपनीने तो मान्य केला तेव्हापासून म्हणजे २००५ पासून २७ सप्टेंबर याच दिवशी गुगलचा वाढदिवस साजरा केला जातो. ७ सप्टेंबर १९९५ रोजी स्थापन झालेल्या गुगल कंपनीच्या रोपट्याचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. गुगल ही आज जगातील सर्वात मोठ्या कंपनीपैकी एक कंपनी आहे. गुगल कंपनी केवळ भूतकाळात रमत नाही तर भविष्याचा वेध घेऊन नवीन नवीन फीचर्स आपल्या ग्राहकांना देते. गुगलने त्यांच्या मुख्य शोध यंत्रात अनेकदा सुधारणा केली असून, इतर अनेक उपकरणांवर त्याचा वापर कसा वाढवता येईल याचा विचार केला आहे. १९९८ साली गुगलने तंत्रज्ञानाचे जग नाट्यमयरित्या बदलून टाकले व सर्च इंजिन कायमचे सुधारून टाकले. गुगलने जग बदलून टाकले. गुगलने इंटरनेट विश्वात क्रांती केली. आज गुगल हे नाव माहीत नसणारा व्यक्ती शोधूनही सापडणार नाही. गुगलमुळे इंटरनेटची विक्रमी वाढ झाली. जगातील अब्जावधी लोक गुगलचा वापर करतात. गुगल हे जगातील सर्वाधिक वापरले जाणारे सर्च इंजिन आहे. गुगलवर आपण आपल्याला पडलेल्या कोणत्याही प्रश्नांचे उत्तर शोधू शकतो म्हणूनच आज ज्याच्या त्याच्या तोंडी गुगल गुरू हा शब्द रूढ झाला आहे. जगातील कोणतीही माहिती अथवा प्रश्नाचे उत्तर हवे असल्यास गुगल गुरूला विचारा तो क्षणात ती माहिती किंवा प्रश्नाचे उत्तर तुम्हाला देईल. गुगल गुरूला वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!



श्याम बसप्पा ठाणेदार
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५
समाजसंवाद

# आत्मा मालिक ध्यानपीठात राष्ट्रीय आयुर्वेद सेमिनार

**कोपरगाव । किसन पवार**

महाराष्ट्र शासन अनुदानित आयुर्वेद युनानी महाविद्यालयीन अध्यापक संघ, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने एनसीआयएसएम, नवी दिल्ली, आयुष्य संचालनालय मुंबई, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक आणि एमसीआयएम मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ''आयुर्वेद-युनानी: सिनर्जिस्टिक सायन्स फॉर हॉलिस्टिक हेल्थ'' या विषयावर राष्ट्रीय सेमिनार २०२५ चे आयोजन करण्यात आले आहे.

हा सेमिनार रविवार, ता. २८ सप्टेंबर २०२५ रोजी आत्मा मालिक ध्यानपीठ येथे पार पडणार असून राज्यभरातील आयुर्वेद व युनानी महाविद्यालयांतील अध्यापक व विद्यार्थी सहभागी होतील, अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.. संघटनेचे कार्याध्यक्ष डॉ. सुरेश पोघाडे यांनी सांगितले की, २००५ मध्ये स्थापन झालेल्या या संघटनेची २०११ मध्ये शासनस्तरावर नोंदणी झाली असून मुख्यालय मुंबई येथे आहे. सध्या १६ अनुदानित आयुर्वेद व ३ युनानी महाविद्यालयांतील सुमारे ३५० अध्यापक या संघटनेशी संलग्न आहेत. सेमिनाराच्या उद्घाटन सोहळ्यात केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव उद्घाटक म्हणून, तर उपमुख्यमंत्री अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील अध्यक्ष म्हणून उपस्थित राहणार आहेत. याशिवाय आमदार आशुतोष काळे, आ संग्राम जगताप, आ संजय कुटे, आ किरण लहामटे, डॉ. ज्योती गायकवाड, आ किशोर दराडे, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आ सुधाकर अडबले, माजी आमदार स्नेहलता कोल्हे, ले. जन. डॉ. माधुरी कानिटकर, कुलगुरू महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ डॉ. रमण घुंगरालेकर, डॉ. मिलिंद आवारे, डॉ. मिलिंद निकुंभ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सेमिनारमध्ये तज्ज्ञ वक्त्यांकडून विविध विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. यामध्ये डॉ. नारायण जाधव ''हक्क, कर्तव्य व वैद्यकीय नीती'', डॉ. गोपाकुमार (कुलसचिव, थ्रिसुर केरळ विद्यापीठ) ''त्वचारोग उपचार'', डॉ. पद्मनाथ केसकर (रुबी हॉल, पुणे) ''आपत्ती व्यवस्थापन व दैनंदिन वैद्यकीय व्यवसाय'', डॉ. जगन्नाथ दीक्षित ''स्थौल्य व मधुमेहातील दीक्षित जीवनमान पद्धतीचा उपयोग'', डॉ. श्रीनिवासुलू ''आम संकल्पना व जीवनशैली'', तसेच डॉ. हमीदुद्दीन (बेंगलोर) यांचा समावेश आहे. सेमिनार दरम्यान औषध कंपन्या, पुस्तक प्रकाशकांचे स्टॉल्स, संशोधन पेपर, पोस्टर व मॉडेल सादरीकरणे होणार असून गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालय, अहिल्यानगर यांच्या वतीने ''विविध आयुर्वेद वनस्पतींचे प्रदर्शन'' आयोजित केले आहे. या कार्यक्रमासाठी डॉ. दिलीप वांगे, डॉ. श्रद्धा सुडे, डॉ. अनिता कोल्हे, डॉ. धनंजय हांगे, आत्मा मालिक ध्यानपीठ अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी व त्यांच्या सहकाऱ्यांचे विशेष सहकार्य लाभले आहे. सेमिनारच्या यशस्वीतेसाठी डॉ. अभय पाटकर, डॉ. मुकेश शुक्ला, डॉ. सुरज एल. ठाकूर, डॉ. सुरेश पोघाडे, डॉ. प्रवीण पेटे आदींच्या नेतृत्वाखालील समिती प्रयत्नशील आहे. रयत समाचार




# अखिल गुरव समाज संघटना तालुकाध्यक्षपदी बाबासाहेब जाधव

**पाथर्डी । नितीन गटाणी**

बुऱ्हाणनगर येथे अखिल गुरव समाज संघटनेच्या बैठकीत तालुकाध्यक्षपदी श्री. वृद्धेश्वर येथील ज्येष्ठ पुजारी बाबासाहेब जाधव यांची निवड करण्यात आली. या बैठकीत अहिल्यानगर दक्षिण जिल्हा कार्यकारणी तसेच तालुका पदाधिकाऱ्यांची निवडही करण्यात आली. यावेळी संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष सुरेखा तोरडमल, नायब तहसीलदार अनिल तोरडमल, दक्षिण जिल्हाध्यक्ष महेश शिर्के आदींसह जिल्ह्यातील कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते..नवनियुक्त तालुकाध्यक्ष बाबासाहेब जाधव यांनी माहिती देताना सांगितले की, समाजाची संघटना प्रभावीपणे बांधणी करून सर्व बांधवांना एकत्रित करणे आणि आगामी कार्यक्रमांबाबत चर्चा करणे हे प्राथमिक उद्दिष्ट असेल. बदलत्या काळानुसार समाजासमोर मोठी आव्हाने उभी आहेत; व्यवसाय व धंद्याला जागा व भांडवलाची कमतरता आहे, मंदिरांमधील सेवा कार्यांवर आधारित चरितार्थ चालवणे कठीण झाले आहे, तर मुला-मुलींच्या विवाहासंबंधी समस्या वाढत आहेत. त्यांनी सांगितले की, समाजाला शासनाकडून सर्वतोपरी सहकार्य मिळावे आणि विशेष सवलती मिळाव्यात, यासाठी जिल्हा व प्रदेश पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली पाठपुरावा केला जाईल. लवकरच तालुक्यातील सर्व बांधवांना एकत्र करून तालुका कार्यकारणी निवडीसंबंधी कार्यक्रम आयोजित केला जाईल. बाबासाहेब जाधव यांनी समाज बांधवांचे सहकार्य आणि उपस्थितीबद्दल आभार मानले, तसेच संघटित समाज व समाजाच्या हितासाठी काम करण्याचे आश्वासन दिले. रयत समाचार



# राजस्थानच्या रखरखत्या उन्हात ब्रह्माकुमार दत्ताभाईंचे अनोखे टेरेस गार्डन

**अबू रोड । श्रीकांत काकतीकर**

महाराष्ट्रासह देशाच्या अनेक राज्यांत यावर्षी पावसाने हाहाकार माजवला आहे. सप्टेंबर महिन्याच्या अखेरीसही अनेक ठिकाणी धो-धो पाऊस कोसळत असताना राजस्थानचे तापमान तब्बल ३८ अंशांपर्यंत पोहोचले आहे. सप्टेंबर महिन्यातील ही परिस्थिती पाहता उन्हाळ्यातील रखरखत्या उष्णतेची कल्पनाच करवत नाही. अशा कठोर उन्हात आपल्या इमारतीच्या टेरेसवर ब्रह्माकुमार दत्ताभाईंनी उभारलेले टेरेस गार्डन सर्वांचे लक्ष वेधून घेत आहे. मुळचे बेळगाव जिल्ह्यातील खानापूर येथील असलेले ब्रह्माकुमार दत्ताभाई गेली ४० वर्षे प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या अबू रोड येथील दूरसंचार विभागात सेवा बजावत आहेत. शांती वनात राहण्यासाठी देण्यात आलेल्या इमारतीच्या टेरेसवर त्यांनी अनोखी बाग फुलविली आहे. रखरखत्या उन्हात जिथे रस्त्यावर किंवा झाडांवर हिरवाई दिसत नाही, अशा राजस्थानातील अबू रोडच्या शांती वन परिसरातील या टेरेस गार्डनमध्ये वांगी, बटाटे, टोमॅटो यांसह विविध रानभाज्या आणि दुर्मिळ औषधी वनस्पतींची लागवड करण्यात आली आहे. याच बागेत अवघ्या पाच फूट उंचीचे केळीचे झाड आणि एका कुंडीत तब्बल चौदा प्रकारची फुलझाडे उगवण्याचा अनोखा प्रयोग त्यांनी यशस्वीपणे साकारला आहे. टेरेसवर हिरव्या रंगाचे आच्छादन करून झाडांना रखरखत्या उन्हापासून संरक्षण दिले आहे. दरम्यान, शांती वन येथे राष्ट्रीय स्तरावरील पत्रकार संमेलनाला आजपासून प्रारंभ झाला असून अनेक उत्सुक पत्रकार दत्ताभाईंच्या या अनोख्या टेरेस गार्डनची पाहणी करून माहिती घेत आहेत. रयत समाचार



# उद्या नागवडे कारखान्याची वार्षिक सर्वसाधारण सभा

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सहकार महर्षी शिवाजीराव नागवडे सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाची ६० वी अधीमंडळ वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, ता. २८ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी दोन वाजता कारखान्याचे चेअरमन राजेंद्र नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली कारखाना कार्यस्थळावर आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, असे आवाहन कारखान्याचे व्हा. चेअरमन बाबासाहेब भोस यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे केले आहे. त्यांनी पुढे सांगितले की, कारखान्याचे विद्यमान चेअरमन राजेंद्र नागवडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या साठाव्या अधीमंडळ सभेची नोटीस व अहवाल सभासदांना पाठविण्यात आले आहेत. स्व. शिवाजीराव बापू नागवडे यांच्या ध्येयधोरणानुसार चेअरमन राजेंद्र नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक मंडळ हे सभासदांच्या हितासाठी सदैव कटिबद्ध राहिले आहे. आतापर्यंत सभासद शेतकऱ्यांच्या हिताला कधीही तडा जाऊ दिलेला नाही आणि भविष्यातही तो जाऊ दिला जाणार नाही, अशी ग्वाही देत सभासदांनी या सभेस उपस्थित राहावे, असे आवाहन व्हा. चेअरमन बाबासाहेब भोस व संचालक मंडळ यांनी केले आहे.



# गुणवंत विद्यार्थी व उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा सत्कार

## अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ पुणे यांचा उपक्रम

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

अहमदनगर जिल्हा मित्र मंडळ पुणे या संस्थेच्या वतीने जिल्ह्यातील गुणवंत विद्यार्थी तसेच उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार सोहळा शनिवार, ता. २७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पुणे येथील एस. एम. जोशी सभागृहात आयोजित करण्यात आल्याची माहिती संस्थेचे उपाध्यक्ष साहेबराव खामकर यांनी दिली. सहाय्यक पोलीस आयुक्त पुणे रंगनाथ उंडे यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या सोहळ्यास उद्योजक अविनाश शहाणे, राष्ट्रीय मराठी मोर्चा (नवी दिल्ली) चे अध्यक्ष आनंद रेखी, पुणे बार असोसिएशनचे माजी अध्यक्ष ॲड. संतोष खामकर तसेच एनएमडी प्रा. लि. चे संस्थापक नवनाथ दरेकर हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी संस्थेच्या वतीने दरवर्षी एमपीएससी, यूपीएससी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसह इतर गुणवंत विद्यार्थी आणि उल्लेखनीय समाजकार्य करणाऱ्या मान्यवरांचा यथोचित सन्मान करण्यात येतो, अशी माहिती संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब पवार यांनी दिली. गरजू विद्यार्थ्यांसाठी लवकरच पुण्यात वसतीगृह सुरू करण्याचा संस्थेचा मानस असल्याचे संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक व राज्याचे सहकार विभागाचे माजी अप्पर आयुक्त भास्करराव शेळके यांनी सांगितले. शनिवारी सकाळी संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर हा सत्कार सोहळा पार पडणार असून या कार्यक्रमास संस्थेचे सर्व सभासद आणि विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन कोषाध्यक्ष साहेबराव मोरे यांनी केले आहे. रयत समाचार



# स्त्रीचे समाजभान सजग, सृजाण आणि प्रगतीशीलतेचे प्रतीक- चौधरी

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

सेवा मंडळ एज्युकेशन सोसायटी संचालित श्रीमती मणिबेन एम.पी. शाह कला आणि वाणिज्य स्वायत्त महिला महाविद्यालय, मराठी विभाग आयोजित 'शारदोत्सव व्याख्यानमाला २०२५ (वर्ष पाचवे) नवदुर्गा : नवाविचार- बहुआयामी स्त्री' या मालिकेतील चौथे पुष्प 'स्त्रीचे समाजभान' या विषयावर लेखिका व समाजसेविका रोटेरियन जयश्री चौधरी यांचे व्याख्यान उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. विद्यार्थिनींच्या उपस्थितीमुळे सभागृहात उत्साहाचे वातावरण रंगले होते. आपल्या व्याख्यानात जयश्री चौधरी म्हणाल्या, स्त्री केवळ कुटुंबाची जबाबदारी सांभाळत नाही तर ती समाजरचनेतील एक सक्षम घटक आहे. समाजभान म्हणजे सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक आणि नैतिक जबाबदाऱ्यांची जाणीव ठेवून कृती करणे होय. स्त्री सजग झाली तर संपूर्ण समाज सुजाण, समतावादी आणि प्रगतिशील होतो. त्यांच्या विचारांना विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त दाद दिली. कार्यक्रमाची सुरूवात एकात्म मानववादाचे प्रणेते पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्र स्वच्छता अभियान यावर प्रतिज्ञा घेऊन झाली. या कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अर्चना पत्की यांनी शुभेच्छा दिल्या. शारदोत्सव २०२५ या सलग नऊ दिवस चालणाऱ्या व्याख्यानमालेचे हे चौथे सत्र असून, विचारमंथन आणि संवादाच्या माध्यमातून विद्यार्थिनींमध्ये नवचेतना निर्माण झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मनाली मणचेकर यांनी केले. प्राची गुढेकर यांनी व्याख्यात्यांचा परिचय करून दिला तर आभार प्रदर्शन दीक्षा घनवटे यांनी केले. प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थिनींच्या मोठ्या उपस्थितीने कार्यक्रम अधिक आकर्षक झाला. शारदोत्सवाच्या या चौथ्या माळेत स्त्रीचे सजग, सृजाण आणि प्रगतीवादी समाजभान प्रभावीपणे प्रकट झाले. रयत समाचार




१ एप्रिल २०२५ पासून पुर्णवेळ आपल्यासेवेत...
श्रीलक्ष्मी होमिओपॅथिक क्लिनिक
डॉ. विद्या गायकवाड | 7588092673
वेळ : सकाळी ११ ते दुपारी ३, संध्याकाळी ५ ते रात्री ९
पत्ता : दर्पण बिल्डिंग, श्रीपाद मेडिकलच्यावर, शनी-मारुती मंदिराशेजारी, दिल्लीगेट वेशीच्या बाहेर, अहिल्यानगर-४१४००१
कृपया, फोन करुन येणे
सर्व आजारांवर होमिओपॅथिक औषधोपचार केले जातील
आजाराचे निदान व समुपदेशन केले जाईल

आनंद मेडिकल
वेळ : २४ तास आपल्या सेवेत
प्रो.प्रा. मनोज बिहाणी
92725 34553
राज हॉस्पिटल
पत्ता : राज हॉस्पिटल, सारसनगर, अहिल्यानगर-४१४००१